# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि.

**दिनांक : 12.09.2026** **वार : शनिवार**

---

1. नवी दिल्लीत आजपासून 18वी ब्रिक्स शिखर परिषद
2. जागतिक अस्थिरतेच्या काळात भारत विकास आणि स्थैर्याबाबतच्या विश्वासाचा स्त्रोत ठरत असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन
3. तंत्रज्ञानातील नवोन्मेषाचा स्वीकार करताना नागरिकांच्या सुरक्षिततेशी तडजोड करू नये, केंद्रिय अर्थमंत्र्यांचा सल्ला
4. पुढचं विश्व मराठी साहित्य संमेलन लंडनमध्ये होणार असल्याची उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची घोषणा आणि
5. कनिष्ठ गट आशिया करंडक हॉकी स्पर्धेत भारतीय संघ अंतिम फेरीत

**<u>ब्रिक्स</u>**

18व्या ब्रिक्स शिखर परिषदेला आजपासून नवी दिल्लीत प्रारंभ होत आहे. भारताच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या परिषदेत सहभागी होण्यासाठी सदस्य देशांसह अन्य निमंत्रित देशांचे नेते नवी दिल्लीत दाखल झाले आहेत. इराण, मलेशिया, अबुधाबी, इजिप्त, नायजेरिया, इथिओपिया या देशांच्या नेत्यांचं काल नवी दिल्लीत आगमन झालं. संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँटोनिओ गुटेरस हेदेखील ब्रिक्स परिषदेत सहभागी होण्यासाठी भारतात आले आहेत. दरम्यान ब्रिक्स परिषदेच्या निमित्ताने भारतात आलेले रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांच्याशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी द्विपक्षीय चर्चा केली. पश्चिम आशिया आणि काळ्या समुद्रातला संघर्षासह विविध मुद्‌द्यांवर दोन्ही नेत्यांनी यावेळी चर्चा केली.

**<u>ब्रिक्स बिझनेस फोरम</u>**

ब्रिक्स देश नवोन्मेष आणि पर्यायांचं महत्त्वाचं जागतिक केंद्र म्हणून उदयास येत आहेत. जागतिक अस्थिरतेच्या काळात भारत विकास आणि स्थैर्याबाबतच्या विश्वासाचा स्त्रोत ठरत आहे, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं. ते काल नवी दिल्लीत ब्रिक्स व्यवसाय परिषदेत बोलत होते. जागतिक जीडीपी अडीच टक्क्यांनी वाढत असताना ब्रिक्सचा जीडीपी साडेचार टक्क्यांनी वाढत असल्याचं त्यांनी नमूद केलं. समुद्री मार्ग आणि खलाशी सुरक्षित असले, पुरवठा साखळीचे मार्ग खुले असले तरच जागतिक व्यापार वाढेल. म्हणूनच भारत खलाशांची सुरक्षा आणि खुले सागरी मार्ग यांचा ठाम पुरस्कर्ता आहे असं मोदी म्हणाले. रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन, यांच्यासह विविध देशांचे राष्ट्राध्यक्ष आणि वरिष्ठ मंत्री, तसंच केंद्रिय वाणिज्य मंत्री पीयूष गोयल या कार्यक्रमाला उपस्थित होते.

**<u>सीतारामन ग्लोबल फिनटेक</u>**

भारतातली युवा पिढी संधीची वाट न पाहता स्वतःच उद्योग व्यवसाय आणि नवे पर्याय निर्माण करत आहे असं मत केंद्रिय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी व्यक्त केलं. त्या काल मुंबईत ग्लोबल फिनटेक महोत्सवात बोलत होत्या. आपण मोठ्या प्रमाणात तंत्रज्ञानातील नवोन्मेषाचा स्वीकार केला पाहिजे मात्र त्यासाठी मानवी जबाबदारी, सुरक्षा आणि लोकांच्या विश्वासाशी तडजोड करू नये असं सीतारामन म्हणाल्या.

**<u>गडकरी</u>**

तंत्रज्ञान आधारित पथकर प्रणालीमुळे राष्ट्रीय महामार्गावरुन वाहतूक करणाऱ्यांची कार्यक्षमता वाढेल, वेळेची बचत होईल आणि एकंदर प्रवासाचा अनुभव चांगला होईल असा विश्वास केंद्रिय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केला. ग्लोबल फिनटेक फेस्टमध्ये फास्टॅग पोर्टेबिलिटीसाठीच्या वन टॅग या सुविधेचं उद्घाटन काल गडकरी यांच्या हस्ते

झालं, त्यावेळी ते बोलत होते. या सुविधेमुळे वाहन मालकांना सध्याचा फास्टॅग राजमार्ग यात्रा ऍपच्या सहाय्याने नवीन बँक खात्याशी जोडता येईल. बँक खाते बदलल्यास फास्टॅग बदलण्याची आता गरज नाही.

**मुख्यमंत्री**

खनिजांच्या विपुल साठ्यांमुळे, विदर्भात भारताच्या आर्थिक विकासाचे एक शक्तिशाली इंजिन बनण्याची क्षमता आहे. असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल नागपूरमध्ये व्यक्त केला. भारतीय अभियंता संस्थेच्या नागपूर स्थानिक केंद्राकडून आयोजित 36 व्या राष्ट्रीय अधिवेशनाच्या उद्घटन कार्यक्रमांत ते बोलत होते. विदर्भात एकंदर 5 लाख कोटी रुपयांची गुंतवणूक होत असून हरित पोलाद क्रांती, आकारास येत आहे. असंही ते म्हणाले.

**साहित्य संमेलन लंडनमध्ये**

पुढील विश्व मराठी साहित्य संमेलन लंडनमध्ये भरवण्यात येईल अशी घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल केली. लंडनमधील महाराष्ट्र मंडळाच्यावतीने शिंदे यांना ग्लोबल प्राईड ऑफ महाराष्ट्र या पुरस्काराने गौरवण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. मराठी माणूस जगाच्या पाठीवर कुठेही गेला तरी आपली माती, भाषा आणि संस्कृती विसरत नाही. जगभरातील मराठी भाषिकांना अधिक भक्कमपणे जोडण्यासाठी लंडनमध्ये हे संमेलन भरवण्यात येईल असं ते म्हणाले.

**पुरस्कार**

राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघानं गाळप हंगाम 2024-25 आणि 2025-26 साठी कार्यक्षमता पुरस्कार जाहीर केले आहेत. यामध्ये राज्यातल्या पुणे, सातारा, कोल्हापूर, सांगली, सोलापूर, अहिल्यानगर, जालना आणि लातूर जिल्ह्यातल्या सहकारी साखर कारखान्यांना विविध श्रेणींमध्ये राष्ट्रीय स्तरावरचे पुरस्कार मिळाले आहेत. तर उत्कृष्ट सहकारी बँकेचा पुरस्कार पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला जाहीर झाला आहे. येत्या 22 सप्टेंबर रोजी नवी दिल्लीत हे पुरस्कार प्रदान केले जातील.

**गणेशोत्सव तयारी आढावा**

पुण्यातला गणेशोत्सव पाहण्यासाठी देशभरातून मोठ्या संख्येनं नागरिक येतात. त्यामुळे गणेशोत्सवाच्या काळात नागरिकांना कोणताही त्रास होऊ नये, यासाठी वाहतूक, सुरक्षा, स्वच्छता, वीजपुरवठा आणि गर्दी व्यवस्थापनाची यंत्रणा अधिक सक्षमपणे कार्यरत ठेवावी, असे निर्देश उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी काल दिले. गणेशोत्सवाच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी विभागीय आयुक्त कार्यालयात झालेल्या बैठकीत त्या बोलत होत्या. या बैठकीला पुणे आणि पिंपरी चिंचवडचे वरीष्ठ प्रशासकीय आणि पोलिस अधिकारी उपस्थित होते.

**जप्त**

राज्यात भेसळयुक्त अन्नपदार्थांविरोधात सुरु असलेल्या कारवाईदरम्यान काल पुण्यात अन्न आणि औषध प्रशासनाकडून चार ट्रक जप्त करण्यात आले. यामध्ये 12 हजार किलो पनीर आणि चार हजार किलो खवा ताब्यात घेण्यात आला. प्रयोगशाळेच्या अहवालानंतर पुढील कारवाई केली जाणार असल्याचं विभागानं सांगितलं.

**एसआयआर**

केंद्रिय निवडणूक आयोगाच्या निर्देशांनुसार येत्या 30 तारखेपर्यंत नवीन मतदार नोंदणी, मतदार यादीतील नोंदींची दुरुस्ती तसंच नाव वगळण्यासाठी नागरिकांना अर्ज करता येणार आहे. या अनुषंगानं पुणे जिल्ह्यातल्या सर्व मतदान केंद्रांवर 19, 20 आणि 26, 27 सप्टेंबर रोजी विशेष शिबिरांचं आयोजन करण्यात आलं आहे.

**भरती परीक्षा**

राज्यातील भरती परीक्षा अधिक सुरक्षित, पारदर्शक, विश्वासार्ह आणि उमेदवाराभिमुख करण्यासाठी राज्य शासनाने उच्चस्तरीय कृती समिती स्थापन केली आहे. या समितीचे सदस्य आज पुण्यात विद्यार्थी, स्पर्धा परीक्षा उमेदवार, शैक्षणिक

संस्था, परीक्षा यंत्रणा आणि विषयतज्ज्ञांशी थेट संवाद साधणार आहेत. सावित्रीबाई फुले विद्यापीठामध्ये होणाऱ्या या बैठकीला पुणे विभागातील संबंधित घटकांना सहभागी होता येईल.

**<u>परवाना कोड-रत्नागिरी</u>**

सार्वजनिक ठिकाणी विनापरवाना आणि नियमबाह्य पद्धतीने फलक तसंच बॅनर लावून शहराचं विद्रूपीकरण करणाऱ्यांविरोधात रत्नागिरी जिल्हा प्रशासनानं कठोर पाऊल उचललं आहे. या नियमांचं उल्लंघन केल्यास मुद्रक, प्रकाशक यांच्यासह फ्लेक्सवर झळकणाऱ्या संबंधित व्यक्तींवरही प्रथमदर्शी सहभाग गुन्हा नोंदवण्याचे आणि तपास करून कारवाई करण्याचे आदेश जिल्हादंडाधिकारी मनुज जिंदल यांनी दिले आहेत.

**<u>जरांगे-जालना</u>**

मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी आज आंतरवाली इथं येण्याचं आवाहन मराठा समाजबांधवांना केलं आहे. पुढील आंदोलनाची दिशा तसंच मुंबईकडे मोर्चा नेण्याबाबत आज निर्णय होण्याची शक्यता आहे. दरम्यान, जरांगे यांच्या मुंबईतल्या प्रस्तावित मोर्चाबाबत कोणताही आदेश द्यायला मुंबई उच्च न्यायालयानं काल नकार दिला.

**<u>बँक संप</u>**

आठवड्यातून पाच दिवसांच्या कामकाजाच्या मागणीसाठी युनायटेड फोरम ऑफ बँक युनियन्सच्या आवाहनानुसार बँक अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी काल देशव्यापी लाक्षणिक संप केला. आपल्या मागण्या मान्य झाल्या नाहीत तर 28 ते 30 सप्टेंबरदरम्यान तीन दिवसांचा संप करण्याचा आणि 26 ऑक्टोबरपासून बेमुदत संपाचा इशारा संघटनांनी दिला आहे.

**<u>दुष्काळ परिस्थिति-लातूर</u>**

राज्यात पावसाअभावी निर्माण झालेल्या गंभीर परिस्थितीची दखल घेत मुख्यमंत्र्यांनी राज्यातील 180 तालुक्यांमध्ये दुष्काळसदृश परिस्थिती जाहीर केली असल्याची माहिती राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी दिली आहे. लातूर जिल्ह्याच्या अहमदपूर तालुक्यातील लांजी या गावात पिकांच्या सद्य परिस्थितीचा आढावा घेतल्यानंतर ते काल बोलत होते.

**<u>मारबत महोत्सव</u>**

145 वर्षांची ऐतिहासिक परंपरा असलेला नागपूरमधील मारबत महोत्सव काल साजरा करण्यात आला. वाईट प्रवृत्ती आणि अनिष्ट प्रथांवर प्रहार करणारे बडगे यंदाच्या मिरवणुकीचे आकर्षण ठरले. या महोत्सवाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, अभिनेते जॅकी श्रॉफ, दिग्दर्शक सुभाष घई यांच्यासह अनेक देशी-परदेशी पाहुण्यांनी हजेरी लावली .

**<u>हॉकी</u>**

चीनमध्ये सुरू असलेल्या कनिष्ठ गट आशिया करंडक हॉकी स्पर्धेत भारतीय मुलांच्या संघानं अंतिम फेरीत स्थान मिळवलं आहे. काल झालेल्या उपांत्य फेरीत भारताने मलेशियाचा 3-1 असा पराभव केला. भारताचा कर्णधार अनमोल इक्का यानं दोन गोल केले. आज कनिष्ठ गटातील महिला संघांच्या उपांत्य फेरीत भारताचा सामना दक्षिण कोरियाशी होणार आहे.

**<u>हवामान</u>**

कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात आज बहुतांश ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता असून तुरळक ठिकाणी मेघगर्जना आणि वीजांच्या कडकडाटासह पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्राचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.